पीएच.डी. संशोधन आराखडा

"मराठी कादंबऱ्यांवरील चित्रपटकथांचा विवेचक अभ्यास"

(विशेष संदर्भ - 'श्यामची आई', 'फकिरा', 'बनगरवाडी', 'नटरंग', '७२ मैल एक प्रवास', 'जोगवा', 'शिक्षणाच्या आयचा घो', 'शाळा' इत्यादी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

बिभीषण संतराम मद्देवाड

(एम.ए., एम.एड्., नेट)

मार्गदर्शक

डॉ.राजकुमार खंडू मस्के

मराठी विभागप्रमुख

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

जून - २०१९

<u>अनुक्रमणिका</u>

१. प्रस्तावना

२. विषय निवडीमागची भूमिका

३. संशोधनाची उद्दिष्टे

४. गृहितके

५. संशोधनाची मर्यादा

६. विषयाचे महत्त्व

७. संशोधन पद्धती

८. प्रकरण मांडणी

संदर्भ ग्रंथ सूची

"मराठी कादंबऱ्यांवरील चित्रपटकथांचा विवेचक अभ्यास"

(विशेष संदर्भ - 'श्यामची आई', 'फकिरा', 'बनगरवाडी', 'नटरंग', '७२ मैल एक प्रवास', 'जोगवा', 'शिक्षणाच्या आयचा घो', 'शाळा' इत्यादी)

१. प्रस्तावना

अलीकडे साहित्याच्या अनुषंगाने बरेच संशोधन झाले आहे. चित्रपट ही कलाकृती असते. तिच्यातसुद्धा मानवी जीवनाचे दर्शन घडते. मानवी जीवनाचे प्रतिबिंब म्हणजे चित्रपट. चित्रपट आणि साहित्यकृती यांचा अनुबंध जवळचा असतो. साहित्य आणि चित्रपट दोन्ही कलाकृतीच असून चित्रपटाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पृथक असतो; त्यापेक्षा साहित्यकृतीकडे पाहण्याची वाचकाची दृष्टी सकस असते. मराठी चित्रपटसृष्टीला मराठी कथा, कादंबरी, नाटक या साहित्यप्रकाराने वैभव प्राप्त करून दिले आहे, हे अपेक्षित धरून मराठी चित्रपट कथांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे मला आवश्यक वाटते.

२. विषय निवडीमागची भूमिका

कलाकृतीच्या अनुषंगानचे संशोधन होत आहे. आपली मराठी चित्रपटसृष्टी संपन्न आहे. मराठी भाषा आणि संस्कृतीला खऱ्या अर्थाने जतन करण्याचे कार्य चित्रपटसृष्टीने केले आहे, हे कुणालाही नाकारता येत नाही. मराठी चित्रपटक्षेत्राला अनेक मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यप्रकारांनी कथानक पुरविलेले आहे; नव्हे मराठी चित्रपट क्षेत्राला वेगळी उंची प्राप्त करून देण्याचे काम मराठी साहित्याने केले आहे. याचीच एक बाजू म्हणून मराठी कादंबरीवर अनेक मराठी चित्रपट निघालेले आहेत. मराठी कादंबरी आणि मराठी चित्रपट यांचे अनुबंध पडताळून पहावयाचे आहेत. मराठी कादंबरीवर आधारलेले मराठी चित्रपट यांचा अभ्यास होणे काळाची गरज आहे. साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' वर 'श्यामची आई' हा चित्रपट निघाला. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीवर 'फकिरा', 'बनगरवाडी' या व्यंकटेश माडगूळकरांच्या

कादंबरीवर ‘बनगरवाडी’, आनंद यादव यांच्या ‘नटरंग’ कादंबरीवर ‘नटरंग’, डॉ.राजन गवस यांच्या ‘चौंडक’ आणि ‘भंडारभोग’ यावर ‘जोगवा’, मिलींद बोकील यांच्या ‘शाळा’ कादंबरीवर ‘शाळा’, रमेश इंगळे यांच्या ‘शिक्षणाच्या आईचा घो’ वर ‘शिक्षणाच्या आईचा घो’, अशोक व्हटकर यांच्या ‘७२ मैल एक प्रवास’ वर ‘७२ मैल एक प्रवास’ इत्यादी चित्रपट प्रसिद्ध झाले. यातील साम्यभेद, मूळ चित्रपट कथा आणि कलाकृती यातील सामर्थ्य आणि मर्यादा यांचा अभ्यास संशोधनाच्या अनुषंगाने व्हावा, यासाठी मी मराठी कादंबरीवर चित्रित झालेल्या मराठी चित्रपटकथांचा विवेचक अभ्यास (विशेष संदर्भ - ‘श्यामची आई’, ‘फकिरा’, ‘बनगरवाडी’, ‘नटरंग’, ‘७२ मैल एक प्रवास’, ‘जोगवा’, ‘शिक्षणाच्या आयचा घो’, ‘शाळा’ इत्यादी) हा विषय मी संशोधनासाठी निवडलेला आहे.

३. संशोधनाची उद्दिष्टे

(१) चित्रपटकथा आणि मराठी कादंबरी यातील वेगळेपणाचा अभ्यास करणे.

(२) चित्रपटकथा आणि मराठी कादंबरीच्या आकृतीबंधाचा अभ्यास करणे.

(३) चित्रपटकथा आणि मराठी कादंबरी यातील समाजदर्शन कसे घडविले जाते याचे विवेचन करणे.

(४) चित्रपटकथा आणि मराठी कादंबरी यातील साम्यस्थळाचा शोध घेणे.

(५) चित्रपटकथा आणि मराठी कादंबरी यातील सौंदर्यस्थळाचा शोध घेणे.

४. गृहितके

(१) चित्रपटकथा आणि मराठी कादंबरी यात मानवी जीवनदर्शन घडते.

(२) मराठी कादंबरी चित्रपटात रूपांतरित होताना काही परिवर्तन अपेक्षित असते.

(३) मराठी कादंबरी आणि चित्रपट यात कलामूल्याबरोबर जीवनमूल्यांचे दर्शन घडते.

(४) तत्कालीन परिस्थितीचे दर्शन आणि वर्तमानकाळाचा अनुबंध चित्रपटात घडतो.

(५) वाङ्मयीन मूल्य कादंबरीत घडते तर प्रायोगिक मूल्ये चित्रपटातून प्रत्ययास येतात.

५. संशोधनाची मर्यादा

मराठी कादंबरीचे क्षेत्र विशाल आणि समृद्ध जसे आहे; तसेच मराठी चित्रपटाचे क्षेत्रही विशाल असेच आहे. मराठी वाङ्मयातील कथा, कादंबरी, नाटकावर आधारित अनेक मराठी चित्रपट प्रसिद्ध झालेले आहेत. तरीही मराठी कादंबरीवर प्रकाशित झालेल्या चित्रपटकथांचा अभ्यास (विशेष संदर्भ 'श्यामची आई', 'फकिरा', 'बनगरवाडी', 'नटरंग', '७२ मैल एक प्रवास', 'जोगवा', 'शिक्षणाच्या आयचा घो', 'शाळा') करावयाचा आहे, हीच माझ्या संशोधनाची मर्यादा आहे.

६. विषयाचे महत्त्व

मराठी साहित्य आणि मराठी चित्रपटकथा यांचा अनुबंध तपासणे, हे या संशोधनाचे फलित ठरणार आहे. साहित्याचा अभ्यास करताना मला चित्रपटसृष्टीचा अभ्यासही करावयास मिळणार आहे. चित्रपट हा प्रायोगिक कलाप्रकार आहे. कादंबरीचा वाचकवर्ग कमी असतो; पण त्याच कादंबरीवर एखादा चित्रपट प्रकाशित झाला, तर तो अनेक प्रेक्षकांपर्यंत पोहचू शकतो. कादंबरी ही एका वेळेस एका वाचकापुरतीच मर्यादित असते तर चित्रपट एकाच वेळेस अनेक प्रेक्षक पाहू शकतात. कादंबरी लिहिणारा लेखक कादंबरी लिहून मोकळा होतो; परंतु त्या कादंबरीवर चित्रपट निघाला की दिग्दर्शक, पार्श्वसंगीतकार, वेशभूषा, छायाचित्रकारांची भूमिका वेगवेगळी असते; या सर्व घटकांचा अभ्यास मला या विषयाच्या अनुषंगाने करावयास मिळणार आहे. सौंदर्यानंदाबरोबर मनोरंजन व प्रबोधन ही दोन प्रयोजने चित्रपटाची असतात. म्हणूनच चित्रपटाच्या पटकथांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरणार आहे, हेच या संशोधनाचे महत्त्व आहे.

७. संशोधन पद्धती

या विषयावर संशोधन करताना तुलनात्मक, विश्लेषणात्मक, समाजशास्त्रीय, ऐतिहासिक, मानसशास्त्रीय, मार्क्सवादी, चरित्रात्मक, सर्वेक्षण इत्यादी संशोधन पद्धतीचा आधार संशोधन करताना घेण्यात येणार आहे.

८. प्रकरण मांडणी

प्रकरण १ ले

<u>कादंबरी, चित्रपट कथा आणि चित्रपटसृष्टी यांचे स्वरूप व विकास</u>

सदरील प्रकरणात कादंबरीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये, मराठी चित्रपटाचा उदय, परंपरा, विकास, मराठी चित्रपटाची जडणघडण, तत्कालीन परिस्थिती, वर्तमानकाळ आणि चित्रपटाकडे बघण्याचा दृष्टिकोन इत्यादी मुद्द्यांच्या अनुषंगाने या प्रकरणाचा अभ्यास करावयाचा आहे. संशोधनाचा विषय मराठी कादंबरीवर आधारित चित्रपट यांचा अभ्यास करावयाचा असल्याने स्थूल मानाने चित्रपटकथा म्हणजे काय? चित्रपट कथेचे प्रयोजन आणि आजची चित्रपटकथा कशा प्रकारची आहे, याचा शोध प्रस्तुत प्रकरणात घ्यावयाचा आहे.

प्रकरण २ रे

<u>‘श्यामची आई’ आणि ‘फकिरा’ यांच्या चित्रपटकथांचे स्वरूप</u>

या प्रकरणात साने गुरुजी व अण्णा भाऊ साठे यांची कार्य आणि कर्तृत्व, साने गुरुजी यांची ‘श्यामची आई’ व अण्णा भाऊ साठे यांच्या ‘फकिरा’ कादंबरी व चित्रपटाची स्थूलमानाने ओळख, चित्रपटाचे कथानक यातील साम्यभेद, व्यक्तीचित्रण, प्रसंगवर्णन, वातावरण, भाषाशैली, संवाद इत्यादी घटकांचा तौलनिक अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण ३ रे

'बनगरवाडी' आणि 'नटरंग' यांच्या चित्रपटकथांचे स्वरूप

या प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर आणि आनंद यादव यांचे वाङ्मयीन कार्यकर्तृत्व, व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' व आनंद यादव यांची 'नटरंग' या दोन्हीमधील सामर्थ्य आणि मर्यादा, चित्रपटाची स्थूलमानाने ओळख, 'बनगरवाडी', 'नटरंग' चित्रपटाचे कथानक यातील साम्यभेद, व्यक्तीचित्रण, प्रसंगवर्णन, वातावरण, भाषाशैली, संवाद इत्यादी घटकांचा तौलनिक अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण ४ थे

'७२ मैल एक प्रवास' आणि 'जोगवा' यांच्या चित्रपटकथांचे स्वरूप

या प्रकरणात अशोक व्हटकर व राजन गवस यांचे वाङ्मयीन कार्यकर्तृत्व, अशोक व्हटकर यांच्या '७२ मैल एक प्रवास' व राजन गवस यांच्या 'जोगवा' चित्रपटाची स्थूलमानाने ओळख, '७२ मैल एक प्रवास', 'जोगवा' चित्रपटाचे कथानक यातील साम्यभेद, व्यक्तीचित्रण, प्रसंगवर्णन, वातावरण, भाषाशैली, संवाद इत्यादी घटकांचा तौलनिक अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण ५ वे

'शिक्षणाच्या आयचा घो' आणि 'शाळा' चित्रपटकथांचे स्वरूप

या प्रकरणात रमेश इंगळे व मिलिंद बोकील यांचे वाङ्मयीन कार्यकर्तृत्व, रमेश इंगळे यांच्या 'शिक्षणाच्या आयचा घो' व मिलींद बोकील यांच्या 'शाळा' चित्रपटाची स्थूलमानाने ओळख, 'शिक्षणाच्या आयचा घो' आणि 'शाळा' चित्रपटाचे कथानक यातील साम्यभेद, व्यक्तीचित्रण, प्रसंगवर्णन, वातावरण, भाषाशैली, संवाद इत्यादी घटकांचा तौलनिक अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण ६ वे

निष्कर्षात्मक विवेचन

या प्रकरणात प्रकरण एक ते पाच या प्रकरणांचा अभ्यास करताना संशोधनांती जे निष्कर्ष हाती येतील याची नोंद या प्रकरणात घ्यावयाची आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

अ. आधारभूत ग्रंथ

१) श्यामची आई

२) फकिरा

३) बनगरवाडी

४) नटरंग

५) ७२ मैल एक प्रवास

६) चौंडक, भंडारभोग

७) शिक्षणाच्या आयचा घो

८) शाळा

आ. संदर्भ ग्रंथांची सूची

१) मा.का. देशपांडे - मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा

२) जुगलकिशोर रामचंद्रजी राठी -भारतीय चित्रपटविधाता : दादासाहेब फाळके, नचिकेत प्रकाशन

३) शिवराज गोर्ले- कथा ते पटकथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

४) अशोक उजळंबकर - लाईट्स, कॅमेरा, ॲक्शन, अजिंक्य प्रकाशन

५) डॉ.वि.ल.धारूरकर -माध्यम समीक्षा, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८८.

६) महावीर गंगाधर-फिल्म उद्योगी फाळके, दिलीपराज प्रकाशन, पुणे

७) घोटाळे रा.ना. - समाजशास्त्रीय तत्त्वे आणि पध्दती, गणेश प्रकाशन, नागपूर १९८२.

८) साप्ताहिक साधना - प्रकाशक नरेंद्र दाभोळकर, सदाशिव पेठ, पुणे

९) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ - लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय मुंबई - तृतीयावृत्ती नोव्हेंबर २००६

१०) द.भि. कुलकर्णी - कादंबरी स्वरूप व समीक्षा

११) प्रा.डॉ.राजेंद्र थोरात - कुंकू ते दुनियादारी, चपराक प्रकाशन, पुणे

१२) श्रीपाद ब्रह्मे - फर्स्ट डे फर्स्ट शो, चपराक प्रकाशन, पुणे

१३) सुधीर नांदगावकर - सिनेमा संस्कृती, अभिनंदन प्रकाशन

१४) यशवंत भालकर - पडद्यामागचा सिनेमा, माणिक प्रकाशन, पुणे

१५) प्रकाश चान्दे - चंदेरी सृष्टी सोनेरी गोष्टी, ग्रंथाली प्रकाशन, पुणे

संशोधक

बिभीषण संतराम मद्देवाड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राजकुमार खंडू मस्के